**महत्वाचे**

जिल्हा नियोजन विकास विभाग
पुणे महानगरपालिका
जा.क्र. डीपीडीसी/ ८३
दि. ३१/०८/२०२१

मा. खातेप्रमुख (सर्व),
पुणे महानगरपालिका

**विषय : आमदार/खासदार स्थानिक विकास कार्यक्रम व इतर कार्यक्रम अंतर्गत मंजूर कामांबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून आमदार/खासदार स्थानिक विकास कार्यक्रम व इतर योजनेंतर्गत विकास कामांची कार्यवाही करण्यासाठी मा. जिल्हा नियोजन व मा. जिल्हा प्रशासन विभागाकडून प्रस्ताव पुणे महानगरपालिकेकडे प्रस्तावाची मागणी केली जाते. पुणे महानगरपालिकेच्या सबंधित विभागाकडून आवश्यक रक्कमेची पूर्वगणनपत्रके तयार करून, प्रशासकीय मान्यतेसाठी जिल्हाधिकारी / जिल्हा नियोजन कार्यालयाकडे सादर केली जातात. त्यावर मा. जिल्हाधिकारी / जिल्हानियोजन कार्यालयाकडून प्रस्तावित कामांचे पुर्वगणनपत्रकामधील नाव व रक्कमेनुसार प्रशासकीय मान्यता दिली जाते. **प्रशासकीय मंजुरीच्या आदेशातील नाव व रक्कमेनुसार, प्रस्तावित पूर्वगणनपत्रक निहाय निविदा प्रक्रिया / खरेदी प्रक्रिया होणे आवश्यक असताना, काही खात्यांकडून या प्रशासकीय मंजूर कामांसाठी निविदा प्रक्रिया / खरेदी प्रक्रिया राबविताना प्रशासकीय मंजूर कामांचे नावात व रक्कमेत परस्पर बदल केले जातात.** अनेक कामे एकत्र करून निविदा मागविली जाते किंवा एका कामाचे अनेक तुकडे करून निविदा / खरेदी प्रक्रिया राबविली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच वेगवेगळ्या ठेकेदार, अनेक रनिंग बिले सादर केली जातात, त्यामुळे मा. जिल्हाधिकारी / जिल्हा नियोजन कार्यालयाकडून प्रशासकीय मंजूरी प्राप्त झालेल्या एका विशिष्ठ कामावर नेमका किती खर्च झाला आहे व किती रक्कम शिल्लक आहे याची माहिती / नोंद ठेवणे अडचणीचे होते. तसेच प्रशासकीय मंजूर कामावर वितरीत झालेल्या निधीपैकी खर्च व शिल्लक रक्कमेचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे अडचणीचे होते.

तरी उपरोक्त बाबींचे अवलोकन होवून, यापुढे सर्व कार्यक्रमांतर्गत प्रशासकीय मंजूर प्राप्त झालेल्या कामांची निविदा प्रक्रिया / खरेदी प्रक्रिया राबविताना मा. जिल्हाधिकारी / जिल्हा नियोजन कार्यालयाकडून प्रशासकीय मंजूरीचे वेळी पाठविण्यात आलेल्या पूर्वगणनपत्रक मध्ये नमूद कामाचे नाव व रक्कमेनुसारच निविदा प्रक्रिया / खरेदी प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही करण्यात यावी. प्रशासकीय मंजूर नाव व रक्कमेत परस्पर बदल केल्यास, त्याअनुषंगाने निर्माण होणाऱ्या अडचणी, परिणामास जिल्हा नियोजन विकास विभाग (डीपीडीसी) जबाबदार राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

मा. स कळावे.

30/8

मुख्य अभियंता (विद्युत)
तथा समन्वय अधिकारी, डीपीडीसी
पुणे महानगरपालिका